# प्रकरण तिसरे

## ' देह जावो अथवा जावो ' या कादंबरीतील व्यक्तिरेखा

-: प्रकरण तिसरे :-

**' देह जावो अथवा जावो ' या कादंबरीतील व्यक्तिरेखा**

- प्रस्तावना
- ' देह जावो अथवा जावो ' या कादंबरीतील मुख्य व्यक्तिरेखा
- नृसिंह
- माई ( नायकाची आई )
- राघव
- तुरूंगातील विलक्षण तरूण
- ' मटकाकिंग ' तरूंगातील विलक्षण तरूणाचा बाप
- आपटेबाई
- ' देह जावो अथवा जावो ' या कादंबरीतील गौण व्यक्तिरेखा
- सुखदा
- राघवची बायको
- तुरूंगातील विलक्षण तरूणाची आई - सावित्री निनावे
- नायकाचे वडील - दादा
- अश्विनशेट
- चिंतन चहावाला
- बच्चूभाय
- सोमा
- फरेराबाई
- ' देह जावो अथवा जावो ' या कादंबरीतील इतर व्यक्तिरेखा
- समारोप
- संदर्भ ग्रंथ

## प्रकरण तिसरे

## ' देह जावो अथवा जावो ' या कादंबरीतील व्यक्तिरेखा

**प्रस्तावना** :-

कादंबरी या वाङ्मय प्रकारात व्यक्तिरेखा या घटकाला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. कारण व्यक्तिरेखांशिवाय कादंबरी आकाराला येत नाही. व्यक्तिरेखा या लेखकाच्या मानसिक प्रक्रियेतून विविध नमुन्यातून आकारास येतात. म्हणून त्या अंतर्मुख व बहिर्मुख अशा दोन्ही स्वरूपात कादंबरीतून साकार होतात. काही व्यक्तिरेखा स्थिर असतात. तर काही विकासशील असतात. अशा व्यक्तिरेखांच्या निर्मितीला लेखकाची प्रतिभाशक्ती असावी लागते.याचे स्पष्टीकरण देताना प्र.वा.बापट व ना.वा.गोडबोले लिहितात," श्रेष्ठ दर्जाचे कादंबरीकार आपल्या प्रतिभेच्या साहाय्याने आपल्या पात्रांचे अंतःकरण उघडे करून दाखवितात. बाह्यसृष्टीतील विविध वस्तूंच्या दर्शनापेक्षा मानवी अंतःकरणात ज्या असंख्य घडामोडी सतत होत असतात. त्यांचे दर्शन वाचक प्रेक्षकास घडले, तर त्यास अधिक आल्हाद होतो "[१]

म्हणजेच लेखकाने पात्रांच्या बाहयवर्णनापेक्षा त्यांच्याआंतरिक मनाचे दर्शन घडविले पाहिजे. या व्यक्तिचित्रणाबरोबरच कादंबरीत कथानकही आकारास येत असते. म्हणून कादंबरी या वाङ्मय प्रकाराच्या घटकात कथानक व व्यक्तिरेखा हे दोन्ही परस्परांना पूरक मानले जातात. त्या कथानकातील वातावरणानुसार व्यक्तिरेखा कादंबरीतून वावरत असतात. याचे स्पष्टीकरण कुसुमावती देशपांडे यांनी पुढीलप्रमाणे केले आहे. " पार्थिव संसाराविषयीची आस्था ही कादंबरीची वृत्ती जीवनाचे कानेकोपरे चौकसपणे धुंडाळणे, तत्त्वदर्शित्वाचा किंवा अदभूताचा मार्ग धरून मूलतः मानवी प्रश्नांचा विचार करणे हा कादंबरीचा दृष्टिकोन जीवन विषयक अनुभव वा कल्पना या कादंबरीचा मूळ आधार किंवा तिची मुख्य सामग्री ही वृत्ती, हा दृष्टिकोन, हे अनुभव वा कल्पना जिवंत व्यक्तिचित्रांच्या व एका विस्तृत आकर्षक कथानकाच्या द्वारे व्यक्त करणे ही कादंबरीची पध्दती "[२]

म्हणजेच कथानक व व्यक्तिरेखा हे परस्परांचे सहकारी आहेत. हे स्पष्ट होते. दोघांच्या एकजिनसीपणातून कलाकृती साकारली जाते. प्रत्येक व्यक्तिरेखेला स्वतःचे असे स्वविशिष्ट भावविश्व आणि व्यक्तित्व लाभलेले असते. या व्यक्तिरेखांना विविध नावे असतात. त्यामुळे कादंबरीतून प्रकट होताना त्या स्वतंत्र पध्दतीने प्रकट होतात. काही अभ्यासकांनी ' व्यक्तिरेखा ' या शब्दासाठी पर्यायी शब्द वापरलेले आहेत. या व्यक्तिवृत्ती प्रवृत्तिनुसार व्यक्तिरेखांचे प्रकारही मानले आहेत. या व्यक्तिरेखा प्रभावी व जिवंत प्राप्त होण्यासाठी लेखक प्रयत्नशील असतो. कारण यावरच कादंबरीचे यश अवलंबून असते.

व्यक्तिरेखा म्हणजे काय ? हे स्पष्ट करण्यासाठी बाबुराव उपाध्ये यांनी पुढीलप्रमाणे व्याख्या केली आहे. " लेखक अवती भोवतीच्या समाजाचे, व्यक्तीचे निरीक्षण करतो, त्यातूनच तो काही व्यक्तीची निवड करतो. त्यांच्या गुणदोषांची जुळणी करतो. त्याच्या भोवती प्रसंगांची गुंफण करतो. अवती भोवतीच्या व्यक्तींमधून निवडलेल्या काही व्यक्ती कलाकृतीत आणतो. त्यांचे वर्णन करतो. कथानकाशी बांधतो अशा व्यक्तींना व्यक्तिरेखा असे म्हणतात."[३]

याच्या आधारे सुमेध वडावाला ( रिसबूड ) लिखित प्रस्तुत कादंबरीचा या प्रकरणात अभ्यास करावयाचा आहे. या कादंबरीत अनेक व्यक्तिरेखा साकारल्या आहेत. काही प्रभावी तर काही दुय्यम स्वरूपात चित्रित झाल्या आहेत. लेखकाने विविध स्तरातील व घटकातील व्यक्तिरेखा साकारल्या आहेत. या कादंबरीतून विशेषत्वाने महानगरीय जीवनातील धड पडणाऱ्या व्यक्तिरेखा आल्या आहेत.

**' देह जावो अथवा जावो 'या कादंबरीतील मुख्य व्यक्तिरेखा :-**

**नृसिंह :-**

नृसिंह हा या कादंबरीतील नायक आहे. ही व्यक्तिरेखा लेखकाने विविध गुणांनी युक्त अशी साकारली आहे. नृसिंह हा एक हुशार, कवितांची आवड असलेला मात्र परिस्थितीने चोर दारूडा बनलेला माणूस आहे. तो स्वतः जगलेल्या आयुष्याचा आलेख डोळयासमोर आणतो. दारुच्या व्यसनामुळे त्याला अनेक संकटांना सामोरे जावे लागते. नरसूने एक नीतिमुक्त,

चाकोरीमुक्त आयुष्य जगले आहे. हे सारे तो आपल्या आत्मकथेत नमुद करतो. अंगावरचे कपडे, अंग, अंगातलं मन, अंगातला आत्मा हे सारं भेसूर विद्रूप झालं आहे. हे सारं तो आत्मकथेत नमूद करतो. परंतु या आत्मकथेच्या लिखाणासाठी त्याच्याजवळ कागद नसतात. म्हणून तो बच्चूभायच्या दुकानातून काही कागद आणि चार पेन चोरतो.

नरसूला चोरी करण्याचे व्यसन लागते ते बेडेकर शॉपमध्ये तिथे सोमा, भिलू, चिकण्या यांच्या सहकार्याने नृसिंह चोरी करतो. हा व्यवसाय त्याने ' भागीदारीत ' सुरू केला. त्यामुळे विजयनगरात नरसूला सगळीच ' अमीर ' म्हणायची. या चोरीमुळे नरसूचे राहाणीमान सुधारते. दररोज कामाला अंधेरी ते दादर हे जाण येणं टॅक्सीने अशा चैनीत नरसू जगत होता. नरसूच्या व्यक्तिरेखेतून लेखकाने एका विलासी तरुणाचे चित्र रेखाटले आहे. आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी कोणत्याही मार्गाचा अवलंब करणारी ही व्यक्तिरेखा आहे.

नरसूला दारूचे आणि चोरीचे व्यसन असले तरी त्याला काही चांगल्या सवयीही होत्या. कारण नरसूला वर्तमानपत्र वाचायला खूप आवडायचे त्यामुळे किती तरी वेळ त्याचा यातच जात होता. राजकारणावरचे लेख, स्वयंपाक घरातल्या टिप्स, सौंदर्यसाधना इत्यादी सर्व लेखन त्याला वाचायला आवडायचे. यातून नरसूच्या चौकस बुध्दीचे दर्शन घडते. त्याला दारूच्या व्यसनाप्रमाणेच वर्तमानपत्र वाचनाचेही एक व्यसनच जडले होते असे म्हणायला हवे. नरसूला चोरी करायचे आवडत नसले, तरी ती सवय जडल्याने सुटत नव्हते. आणि आपल्या गरजा पूर्ण व्हाव्यात म्हणून तो चोरी करायचा. त्याला वाटायचे " दारूच्या व्यसनापेक्षा हे चोरीचं व्यसन अधिक नशादायी होतं. ते भागवत राहिलं तरच दारूची ऐषमध्ये राहण्याची व्यसनं करता येणं शक्य होतं."[४]

परंतु नरसू रंगेहाथ पकडला जातो. त्यामुळे त्याची नोकरीही जाते. दारूचे व्यसन मात्र सुटत नाही. म्हणून त्याच्या आयुष्यात दु:खाची साखळी निर्माण होते. त्यामुळे त्याची जीवनेच्छा मावळली जाते. आपल्याला लवकारात लवकर मरण यावं अशी भावना मनाला चाटत राहते. त्याला वाटते आपलं अस्तित्व ना कुणाला सुसंगती देऊ शकलं ना आपण कुणाचे सुजन होऊ शकलो. हे त्याच्या मनाला डाचत राहते.

कौटुंबिक परिस्थिती गरिबीची असल्यामुळे नरसूने आपल्या मनाचे चोचले पुरवून घेण्यासाठी ' बेडेकर शॉप ' मध्ये पैशांची चोरी सुरू केली होती. परंतु तिथे ' रंगेहाथ ' पकडला जातो. आणि दारुच्या व्यसनामुळे घरातूनही हाकलून दिले जाते. त्यामुळे  त्याची बेवारशासारखी अवस्था होते. बच्चू भायने दिलेला चहा,टिळक मंदिरातल्या लग्नाचं उरलं सुरल जेवण आणि राघव घालत असलेली पैशाची भीक याच्यावरच त्याचं आयुष्य चालतं. अशा परिस्थितीत त्याच्या मनाला सतत वाटायचे की, आपला उदरनिर्वाह चालावा, दोन खोल्यातला आसरा मिळावा, सुखदा व सुकुमार आपल्याबरोबर रहावेत, आपलाही चारचौघांसारखा संसार नांदावा. परंतु व्यसनामुळे त्याची ही इच्छा पूर्ण होत नाही.

नरसू व्यसनी असला तरी बुध्दिमान होता. शाळेत असताना त्याच्या शिक्षिका त्याला ' एकपाठी ' म्हणायच्या. शिक्षिकेने नरसूला एकदा ' घनपाठी ' या शब्दाचा अर्थ विचारला होता. नरसूला त्या शब्दाचा अर्थ माहीत असूनही तो काव्यात्म भाषेत उत्तर देतो. त्या शब्दाचा ' मोर ' असे उत्तर सांगून पुढील ओळी गाऊ लागतो -

" घनपाठी मोराच्या,
पोलीस तो चोराच्या !
मोर वळूनी पाहि घना,
चोर पळून जाई वना !
वन बंधू दोघे ही !
पकडण्यास दोघां ही -
चोरावर मोर, चोरावर मोर !"[५]

अशा उस्फूर्तपणे सुचलेल्या काव्यपंक्तीतून नरसू आपटेबाईना उत्तर देतो. या वर्णनातून लेखकाने नायकाच्या बुध्दिमत्तेचे दर्शन घडविले आहे. परंतु अशा बुध्दिमत्तेचा पुढे काहीही उपयोग होत नाही. कारण माई त्याला पुढील शिक्षणास नकार देते. व ' बेडेकर शॉप ' मध्ये कामाला पाठविते.

तसेच नरसू दारूच्या व्यसनासाठी विविध लोकांकडून पैसे घेतो. त्याचे कर्ज राघवला फेडावे लागते. या व्यसनापायी नरसू घरही विकेल म्हणून राघवची बायको त्याला घराबाहेर काढते. त्यामुळे त्याला राहण्यासाठी अनेक पर्याय शोधावे लागतात. लग्नाच्या हॉलमध्ये राहणाऱ्या वऱ्हाडी मंडळीत, म्हशीच्या तबेल्यात शेण उपसणीचं काम करून त्याबदल्यात राहावं लागत, देवळाच्या वळचणीला राहातो. तर रेल्वे स्टेशनातदेखील राहावं लागत. या सर्व पर्यायात त्याला रेल्वेस्टेशनातला मुक्काम आवडतो. परंतु पोलिसांच्या त्रासामुळे तिथे जास्त काळ राहणं शक्य नसते. तो म्हणतो " सर्वात सोपं, त्यातल्या त्यात सुखदायी राहणं हे रेल्वे प्लॅटफॉर्मवरचं ! पंखा असतो, संडास - मुतारी असते. केव्हाही पाणी मिळू शकतं प्यायला. आणि रात्री उशिरा स्टॉलवाले राहिलेला माल, वडे, भजी, पाव असा वाटून टाकतात. कधी भाग्यात असलं तर मोसंबीचा ज्यूस, सरबतंही मिळू शकतात. नशिबात असेल तर नीरासुध्दा ! "[६]

अशा चित्रणातून लेखक आपल्यासमोर एका महानगरीय व्यसनी तरुणाची वाताहत मांडतात. त्याला घरदार सोडावे लागते, अनेक समस्यांना सामोरे जावे लागते, अनेक मरण यातना भोगाव्या लागतात. नरसू यासर्व घटकांचा प्रतिनिधी म्हणून या कादंबरीतून येतो. त्याला आयुष्यातील वीस - एकवीस वर्ष या दु:खाला तोंड दयावे लागते. एकेकाळी बुध्दिमान असलेला नरसू व्यसनामुळे त्याची अवस्था अत्यंत दयनीय होते. शाळेत असताना नरसूने गुरुपौर्णिमेची भेट म्हणजे ' गुरुदक्षिणा ' म्हणून आपटेबाईना ' ए ' या आदयाक्षराचे सर्वच शब्द तोंडपाठ म्हणून दाखवितो. आणि ' ट्रिपल ए ' अशी नव निर्मिती करुन त्याचे स्पष्टीकरण तो " अनसूया अनंत आपटे " असे करुन दाखवितो. याचे आपटेबाईंना अत्यंत आश्चर्य वाटते. त्या म्हणतात. "अनसूया अनंत आपटे ' ट्रिपल ए ' अशी दक्षिणा ना मला यापूर्वी कुणी दिली होती. ना नंतरही कधी दिली गेली "[७]

नरसूची बुध्दिमत्ता अशी कुशाग्र असली, तरी व्यसनामुळे त्याला भविष्यात् तिचा कधीच उपयोग होत नाही. यासर्व अनुभवांना नरसू आत्मकथेच्या रूपात शब्दबध्द करतो. ही आत्मकथा तो तीन टप्प्यात लिहून काढतो. रात्रंदिवस असे गेले काही दिवस लिहीत होता तो पहिला टप्पा ! पोलीस कोठडीतला लिहिलेला दुसरा टप्पा!, आणि नंतर..आपटेबाई भेटल्यानंतरचा तिसरा टप्पा

म्हणजे घर, उंबरठा आणि अंगण अशी योजना लेखक या ' आत्मकथेला ' देतात. नायकाच्या या चढ - उतार अशा जीवनकथेविषयी प्रल्हाद वडेर या कादंबरीच्या प्रस्तावनेत म्हणतात की, " नृसिंह जोशी, आत्मचरित्र लेखनाच्या, म्हणजेच आत्मचिंतनाच्या द्वारा आपल्या जगण्याच्या श्रीशिलकीचा विचार करतो आहे. एका स्वप्न खुळया, शिवसुंदर क्षणाचा पडलेला विसर हीच ती श्रीशिल्लक आहे. आपल्या जन्मदात्रीने दिलेले ' नृसिंह ' हे नाव हीच ती श्रीशिल्लक आहे. या निष्कर्षाला तो येतो."[८]

अशा विविध पैलूंनी घडविलेली नरसू ही व्यक्तिरेखा लेखक या कादंबरीतून चित्रित करतात. यातून नायकाची सामाजिक व आर्थिक स्थिती आपल्या लक्षात येते. थोडक्यात सांगायचे झाले तर नरसूची कथा ही दारूच्या नशेमुळे ती नाशाकडे सहज कशी जाते याचेच चित्रण लेखकाने या कादंबरीतून केले आहे.

**<u>माई ( नायकाची आई )</u>** :-

कादंबरीतील नायक नृसिंह याची आई असलेली ' माई ' ही व्यक्तिरेखा महत्त्वाची आहे. तिचा स्वार्थी स्वभाव, स्वतःचा मुलगा नरसू आणि सावत्र मुलगा राघव यांच्यात भेद मानते. नरसूच्या भल्यासाठी सतत झटते. अशा विविध वैशिष्टयामुळे ही व्यक्तिरेखा वाचकांच्या लक्षात राहाते. स्वार्थी स्वभावामुळे ती नरसूचे आयुष्य वाया घालविते. ' बेडेकर शॉप ' मध्ये कामाला पाठवून त्याला पैसे चोरण्यास प्रोत्साहन देते. मात्र मुलाच्या व्यसनाधीन जीवनाबद्दल अपार चिंताही करते. घरातील कोणत्याही प्रसंगी ती त्याचीच बाजू घेते. अशा या व्यक्तिरेखेबद्दल प्रल्हाद वडेर कादंबरीच्या प्रस्तावनेत म्हणतात," सुमेध वडावालांनी माईची व्यक्तिरेखा काळया - पांढऱ्या, बऱ्या - वाईट प्रवृत्तीसह प्रभावीपणे रंगविली आहे."[९]

कुटुंबाची आर्थिक स्थिती गरिबीची असल्याने माई जेवणाचे डबे बनवायची. त्यामुळे घर संसाराला मदत होत होती. कारण घरातील गरिबी कायम टिकून होती. म्हणून ती नरसूला शिकण्यास नकार देते. आणि बेडेकर शॉपमध्ये कामाला पाठविते. ती त्याला म्हणते -" पुढे शिकत राहून माझ्या हातातली झारा कढई नि पोळया लाटण्याचं काम हयातभर कायम ठेवायचा

विचारआहे की काय ? की ' सावत्र लेक पोसतोय माई जोशीणीला, घराला ' असा जगाकडून होणारा उच्चार कायम ठेवायचा विचार आहे ? आधी कामाला लाग ! झालासना म्याट्रीक ? पुरे झालं !"[१०]

कारण यात माईचं काहीच बिघडत नव्हतं. जी माई सावत्र मुलाच्या कमाईवर आपण जगलो तर जग काय म्हणेल याची पर्वा करत होती. तिने स्वतःच्या मुलाचे शिक्षणही नाकारले होते. कारण माई आपटेबाईंनी पाठविलेला पुढील शिक्षणाविषयीचा निरोप नरसूपर्यत पोहचू देत नाही. तर राघवने बघितलेल्या विविध ठिकाणच्या कामांवर त्याला पाठवत नाही. कारण तिला ' बेडेकर शॉप ' म्हणजे कामधेनू वाटत होते. तिथल्या चोरीचे तिला समाधान वाटत होते. कारण माई नरसूला म्हणायची, " अशी लक्ष्मी घरात आली, तरच तव्यावरचं पोळया भाजणं सुटेल तुझ्या आयशीचं..! पोट पुरतं भरलं की थोडाच करायचा हा कारभार ?"[११]

अशा तिच्या स्वार्थी स्वभावामुळे नरसूचे चोरीचे प्रमाण वाढते. ती त्याला नेहमी म्हणायची राघवने घेतली तशी खोली तुलाही घ्यायची. यातून तिचा स्वभाव लक्षात येतो. एवढेच नव्हे, तर सावत्र मुलाला मूलबाळ नाही आणि आपल्या मुलाला मूल आहे. या गोष्टीचा तिला अतिशय आनंद होतो. राघवच्या बायकोच्या वांझपणाविषयी तिला अजिबात दुःख नव्हते. उलट तृप्तीची व विजयाची भावना तिच्या चेहऱ्यावर तरळत राहते. आणि नातवाला छातीशी घेऊन म्हणायची " तूच मला आजी केलस हो sss"

माई नरसूचे आयुष्य वाया घालवते हे जरी खरे असले, तरी हे सगळे ती त्याच्या प्रेमापोटी करते. त्याचे भले व्हावे हीच तिची इच्छा असते. नरसू लहान असताना त्याचे विविध हट्ट पुरविते. साजूक तुपातला शिरा आवडतो. म्हणून उसनं तूप आणून रव्याचा शिरा बनविते. तर शाळेच्या सहलीला पाठविण्यासाठी विकत आणलेलं लुगडं दुकानावर परत करुन आणलेल्या पैशातून सहलीला पाठविते. म्हणून त्याच्या अधोगतीबद्दल स्वतःला दूषण देत पश्चाताप करते. ती म्हणते," नरसू, तुझ्या या अधोगतीला मीच जबाबदार आहे. मीच तुला भरीला पाडलं बेडेकरांकडे!मरताना मला हीच टोच आहे. मला कावळा शिवणार नाही..."[१२]

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

लेखकाने ही व्यक्तिरेखा दोन्ही बाजूंनी मांडली आहे. एका बाजूने ती राघवचा द्वेष करते आणि नरसूचे जीवन बरबाद होण्यास करणीभूत ठरते. तर दुसऱ्या बाजूला या कृत्याचा पश्चाताप करते. स्वतःला दोषी ठरविते. कारण तिच्या लग्नानंतर बऱ्याच वर्षांनी नृसिंहचा जन्म होतो. मात्र त्याच्या जीवनाची वाताहत झाल्याने तिला दुःख होते. त्याची जागा ना घरात असते, ना घराबाहेरच्या अंगणात, त्याचं आयुष्य हे उंबऱ्यावरच राहतं. म्हणजेच तो सुखाचा धनीही होत नाही आणि पराकोटीच दुःखही त्याच्या वाटयाला येत नाही. याच गोष्टीचं माईला मरतांना अत्यंत वाईट वाटतं. जीवनभर ती मुलासाठी झटते. परंतु आपल्या मुलाचे आयुष्य सुधारत नाही म्हणून तिला मरतानाही दुःखच होतं.

**राघव** :-

प्रस्तुत कादंबरीत राघव हीही एक प्रमुख व्यक्तिरेखा आहे. कादंबरीतील नायक नरसूचा सावत्र भाऊ या नात्याने ही व्यक्तिरेखा येते. राघव हा नरसूच्या भल्यासाठी नेहमी प्रयत्न करतो. लेखकाने ही व्यक्तिरेखा कधी प्रेमळ तर कधी व्यावहारिक स्वरूपात मांडली आहे. नरसूचे व्यसन सुटावे म्हणून सतत धडपडणारा राघवच या कादंबरीतून दिसतो. नरसूला वेळोवेळी पैसे देतो. त्याच्या खाण्या - पिण्याचीही काळजी घेतो. कुणाकुणाकडून घेतलेली कित्येक कर्जेदेखील राघव भागवून टाकत असतो. तसेच नरसूच्या तब्बेतीची काळजीही तो घेतो. याचा प्रत्यय आपणास पुढील संवादातून येतो.

" नरसू तुला नीट दिसतं ना रे ?
तुला डायबिटीस आहे का ? तपासून घ्यायला हवं
तुझ्या डोळयाभोवती, बुबुळांभोवती पांढरं कडं दिसू लागलं नरसू आणि
पायांवरही अशी सूज ... ? बाप रे sss? "[१३]

अशा विविध प्रकारच्या प्रश्नांची निर्मिती करुन लेखकाने नरसू व राघव यांच्यातील प्रेम व्यक्त केले आहे. नरसूच्या ढासळत जाणाऱ्या शरीराची तो काळजी घेतो. सरकारी नोकरीतून सेवानिवृत्त झाला आहे. तो देखील एक मध्यमवर्गीय जीवन जगतो. आणि बायकोचा सौम्य विरोध

असला तरी नरसूची दारु सुटावी म्हणून सात वेळा ' अल्कोहोलिक ॲनॉनिमस ' मध्ये ठेवतो. त्याचे कपडे फाटल्यावर वेळोवेळी नवे कपडे घेऊन देतो.

अशा सर्व प्रकारची काळजी घेत असला, तरी राघव २०-२१ वर्षात नरसूला कधीच परत घरी घेऊन जाण्याचा विचार करत नाही. बायकोच्या विरोधात जाऊन नरसूला सहारा देण्यासाठी धडपडत नाही. यातून राघवचा व्यवहारी दृष्टिकोन लेखकाने मांडला आहे. नरसूने घरी नेण्याबद्दल विचारले असता राघव, त्याच्या समाधानासाठी म्हणतो की, " जे अशक्य आहे, ते का विचारतोस तू ? आणि तू धड असतास तर हे विचारायची वेळ आली नसती तुझ्यावर...!"[१४]

राघवला नरसूचे ' बेडेकर शॉप ' मध्ये कामाला जाणं, तिथे पैशाची चोरी करणं, अंधेरीहून दादरला रोज टॅक्सीने कामावर जाणं आणि रविवारी संभाजीनगरातल्या टोळक्याबरोबर नवा सिनेमा पाहणं अजिबात आवडत नव्हते. कारण त्याला हे सर्व अनैतिक वाटत होते. एवढेच नव्हे तर या सर्व प्रकाराला कंटाळून नरसूची बायको सुखदादेखील माहेरी निघून जाते. त्यामुळे नरसू राघवला म्हणतो की, " सुखदा माहेरी गेली नसती, तर सुधारलो असतो मी !" तर राघव त्याला म्हणतो की," म्हणजे आगीत जळत राहायला सांगायचं तिला ? बायकोला नवरा काय कुंकवापुरता हवा असतो...? नोकरी सुटल्यानंतरची एखादी तरी रात्र आठवते तुला धडपणी घरी आल्याची ? कोण आणून तुला गेटवर सोडायचं हे तरी आठवतं का तुला ? कशी राहाणार ती ?"[१५]

अशा शब्दातून लेखकाने राघवचा परखडपणा मांडला आहे.म्हणजेच लेखकाने राघव ही व्यक्तिरेखा प्रेमळ, व्यवहारी आणि परखड इत्यादी गुणांनी युक्त अशी या कादंबरीतून मांडली आहे. नरसूच त्याच्या परिस्थितीला जबाबदार आहे असे त्याचे मत आहे. तरी एक कर्तव्य म्हणून तो नरसूची वेळोवेळी काळजी घेत असतो. हाच त्याच्या मनाचा मोठेपणा लेखकाने या कादंबरीत मांडला आहे.

**<u>तुरुंगातील विलक्षण तरुण</u>** :-

नायकाला तुरुंगात भेटलेला विलक्षण तरुण ही व्यक्तिरेखा महत्त्वपूर्ण आहे. हा तरुण एका ' मटकाकिंग ' चा मुलगा आहे. काव्य वाचन व नाटयनिर्मिती, नाटकात काम करण्याची त्याची आवड असते. परंतु वडिलांच्या आग्रहास्तव त्याला मटका व्यवसायातच लक्ष घालावे लागते. त्यामुळे वेळोवेळी पोलिसांच्या कारवाई आणि पोलीस कोठडी यांना त्याला सामोरे जावे लागते. अशा एका कोठडीत या तरुणाची व नायकाची भेट होते.

गर्भश्रीमंतीमुळे अंगावर उत्तम कपडे, अंगभर ऐश्वर्याचे तेज, चेहऱ्यावर बेफिकीरी असे या तरुणाचे व्यक्तिमत्व आहे. तुरुंगात असून देखील त्याच्या चेहऱ्यावर अजिबात चिंता नसते. अगदी बिनधास्त असतो. शिक्षण पूर्ण झाल्यावर नाटकात करीअर करायचे होते. पण बापाच्या विरोधाला बळी पडून तो या व्यवसायात उतरतो आणि धाडसी बनतो. पोलिसांच्या ' धाडी ' अनेकवेळा त्यांच्या व्यवसायाच्या ठिकाणी पडतात. त्यामुळे तुरुंगात जाणं हे जीवनाचे एक अंग बनते. कित्येक वेळा सवय असावी म्हणून त्याचा बाप स्वतःहून त्याला तुरुंगात पाठवितो. आणि पोराला पोलिसी ' हिसका ' दाखवा म्हणून पोलिसांना बजावतो. याचा त्या तरुणाला रागही येतो. पण नंतर सवय होऊन तो या व्यवसायात रुळतो.

तरुण या व्यवसायात रुळला असला, तरी त्याची काव्याची आवड कमी होत नाही. त्याला जेव्हा संधी मिळते तेव्हा तो कविता वाचतो अथवा पाठही करतो. या तरुणाची तुरुंगात नायकाशी भेट झाल्यावर त्याला मनात कवितांच्या भेंडया खेळण्याची इच्छा निर्माण होते. म्हणून तो नरसूला म्हणतो ," तुला पाहिल्यावर आज माझ्या मनात वेगळीच इच्छा निर्माण झाली आहे. माझ्या धंदयात तुझ्यासारखी माणसं भेटत नाहीत. कधी क्वचित इथे आल्यावर तर अशक्यच अशक्य ! म्हणूनच तशी इच्छा निर्माण झाली आहे. तयार आहेस तू ?"[१६]

आणि नरसूच्या होकाराची अपेक्षाही न धरता कविता गाऊ लागतो. म्हणजेच लेखक याठिकाणी त्या तरुणाच्या आवडीविषयीचे चित्रण करतात. त्याची काव्यविषयक आवडही

वाचकांना आश्चर्यकारक वाटते. कारण एका ' मटकाकिंग ' चा मुलगा आणि काव्याची आवड. यातून लेखकाने दोन्ही गोष्टींचा समन्वय साधला आहे.

आपल्या व्यवसायात मुलाने पारंगत व्हावे म्हणून त्याचा बाप या तरुणाला ' सायकॉलॉजी ' घेऊन एम्.ए. करायला लावतो. त्याचा बाप एवढयावरच थांबत नाही. तर बॉडीलँग्वेजचं प्रशिक्षणही घ्यावयास सांगतो. कारण संपर्कात आलेल्या प्रत्येक माणसाच्या मनातले विचार थेटपणे आपणास कळायला हवे असे त्याच्या बापाला वाटत असते.

या तरुणाची आवड मटका व्यवसायापेक्षा नाटक दिग्दर्शनाकडे जास्त होती. कारण त्याने महाविद्यालयीन जीवनात ' रंगमंचावरच्या 'प्रत्येक एकांकिका स्पर्धाही त्याने जिंकल्या होत्या. त्यात त्याला करिअर घडवायचे असते, सिनेमा व सिरीअल्स ही काढायच्या होत्या. यातून या तरुणाची कलात्मक आवड लेखकाने या कादंबरीत चित्रित केली आहे. अशा वेगवेगळया क्षेत्रात आपला ठसा उमटविणारी या तरुणाची व्यक्तिरेखा या ठिकाणी लेखक साकारतात.

याचबरोबर लेखकाने या तरुणाच्या प्रेमळ आणि मानवतावादी स्वभावाचेही चित्रण केले आहे. कारण ज्या अधमाने स्वतःच्या मुलीवर बलात्कार केला आहे. त्या मुलीविषयी तरुण हळहळतो. तसेच नरसूच्या व्यसनाधीन आयुष्याच्या वाताहतीबद्दलही त्याला वाईट वाटते. म्हणून तो नरसूला धीर देण्याचा प्रयत्न करतो. त्याला आयुष्यातील आणि तुरुंगातील दुःख सहन करण्याविषयी धीर देतो. नरसूच्या बेघरावस्थेविषयी ही त्याला दुःख होते. अशी मार्दवता व मानवता त्याच्या स्वभावातून दिसून येते. खरे तर गुन्हेगारी जगतातील वावर असतानादेखील या तरुणाने आपली स्वतंत्र ओळख या कादंबरीतून दाखविली आहे. म्हणून अशा प्रकारची व्यक्तिरेखा निर्माण करून लेखकाने कादंबरीची रंजकता वाढविली आहे. असे आपणास या व्यक्तिरेखेच्या अभ्यासावरून म्हणता येते.

**'मटकाकिंग '-तुरुगांतील तरुणाचा बाप :-**

' मटकाकिंग ' ही व्यक्तिरेखा गुन्हेगारी जगतातील आहे. कादंबरीतील विलक्षण तरुणाचा बाप या नात्याने ही व्यक्तिरेखा येते. त्याचा बाप मटका व्यवसायात ' किंग ' असल्याने ' मटकाकिंग ' असाच उल्लेख या कादंबरीतून लेखक करतो. ही व्यक्तिरेखा कादंबरीतून स्वतः संवाद साधत नाही. त्याच्या मुलाच्या संवादातून ती प्रकट होते. त्यात तिचे विविध गुण लेखकाने साकारले आहेत. स्वभाव, धाडसी व्यक्तिमत्त्व, गुन्हेगारी जगतातील वर्चस्व, हुकूमशाही वृत्ती आणि केलेल्या उपकाराविषयीचा हक्क गाजविणे इत्यादी वैशिष्टये या ठिकाणी लेखकाने साकारली आहेत.

आपण गुन्हेगारी स्वरूपाचा व्यवसाय करतो. त्यामुळे आपण कायदा पाळत नाही. तरी आपल्याला इज्जत ही हवीच. त्यासाठी पैसा मोजावा लागला तरी चालेल. असे त्याचे चमत्कारिक मत आहे. म्हणून स्वतःच्या मुलालादेखील मटकयाचा व्यवसाय करण्यास भाग पाडतो. मुलाची कविता व नाटकविषयीची आवड त्याला फालतू वाटते. त्याला बिघडवून टाकते असे त्याला वाटते. म्हणून मुलाच्या वाढदिवसाची भेट म्हणून त्याचा बाप सर्व कवितांची पुस्तक जाळून टाकतो.

स्वतःला गुन्हेगारी जगात ' डॉन ' होता आले नाही.म्हणून पुढच्या पिढीवर आपले विचार तो लादतो. म्हणजेच जे आपल्याला साध्य झाले नाही. ते नातवाकडून साध्य करून घेण्याची धडपड या मटकाकिंगची असते. त्यासाठी ते नातवाला " आजच ते त्याला ओपन आणि क्लोज म्हणजे काय ते चाविष्टपणे सांगतात. ' जनता ', ' कल्याण ', ' मार्निंग जनता ', ' नाईट जनता ', ' न्यू वरळी ', ' मुंबई मेन ' अशा सगळया नावासह ते मटके फुटण्याची रोजची वेळ माझ्या मुलाला पाठ आहेत."[१७]

असे तुरुंगातील तरुण नायकाला सांगत असतो. या मटकाकिंगचे वर्चस्व गुन्हेगारी विश्वाबरोबरच घरातही असते. नातवाला मटक्याची पूर्ण माहिती देतो. तशीच ' रायफल शूटिंग ' ही नातवाला शिकवितो. घरातील वातावरण गुन्हेगारीमय करून टाकतो. नातवाला घरातच ' मास्टर

शूटरकडून ' प्रशिक्षण देतो. यातून या मटकाकिंगची सत्तापिपासू वृत्ती वाचकास दिसते. दुस-याची लगाम आपल्याच हाती रहावा असे त्याला सतत वाटते. म्हणून आपल्या बापाविषयी तरुणाला वाटते की, "...त्यांना स्वतःला दुनियाको झुकानेवाला व्हायचं होते. नाही होता आलं त्यांना त्यांच्या हयातीत पैसा भरपूर मिळवला त्यांनी...! पण ' मटकाकिंग ' या उपाधीपलीकडे जाता आलं नाही त्यांना, स्वतःच्या अतृप्त स्वप्नांच्या पूर्तीचं साधन म्हणून ते त्यांच्या नातवाकडे पाहतात."[१८]

म्हणजेच त्यांच्यामते गुन्हेगारी हाच प्रतिष्ठेचा व्यवसाय असतो. सरकारने स्वतःची लॉटरी सुरू केली तेव्हाच मटक्यालाही रीतसर परवानगी दयायला हवी होती. असे त्याला वाटते. म्हणून शिक्षकी, डॉक्टरी, बँकिंग, दुकानदारी या व्यवसायाप्रमाणेच गुन्हेगारी हा देखील व्यवसायच समजला जावा असा विचार मटकाकिंग करतो.

-

या मटकाकिंगचे शिक्षण एल.एल.बी. पर्यत झाले आहे. काही काळ वकिलीचा व्यवसाय ही करून तो पाहतो. परंतु काळा डगला घालून कोर्टाबाहेर रस्त्यावर उभे राहून गि-हाईकांची वाट पहावी लागायची अशा बेकारीला कंटाळून मटका व्यवसायाकडे वळतो. आणि उपजत बुध्दिमत्ता व मटक्याच्या एकूण ' सिस्टिम ' चा त्यांने अभ्यास केल्याने तो या क्षेत्रात किंग होतो. अशा व्यक्तिमत्त्वातून लेखकाने महानगरीय गुन्हेगारी क्षेत्रातील बडया व्यक्तीचे चित्रण केले आहे.

<u>आपटेबाई</u> :-

कादंबरीच्या अखेरच्या - अखेरच्या भागात आपटेबाई भेटत असल्या, तरी ही व्यक्तिरेखा अत्यंत लोभसवाणी आहे. म्हणून प्रमुख व्यक्तिरेखा म्हणून या व्यक्तिरेखेकडे पाहता येते. टिळक विदयालयात शिक्षिका म्हणून आपटेबाईंनी बरीच वर्षे काम केले आहे. कादंबरीतील नायक नरसू हा आपटेबाईंचा लाडका विद्यार्थी असतो. अत्यंत कार्यक्षम शिक्षिका म्हणून त्या या कादंबरीतून येतात. नरसू मॅट्रीक झाल्यानंतर त्यांची नरसूशी भेट होत नाही. आणि बाईंना नरसू भेटतो त्यावेळी त्या अतिशय वृध्द झालेल्या असतात. त्यांची दृष्टी कमकुवत झालेली असते. अशा या आपटेबाईंच्या व्यक्तिरेखाटणातून लेखकाने एका आदर्श शिक्षिकेचे दर्शन घडविले आहे.

त्यांच्या आयुष्यातली इच्छा म्हणजे आपला विद्यार्थी ' नृसिंह ' आपल्याला एकदा तरी भेटावा अशी असते. ही इच्छा अतृप्त राहूनच मरुन जाणार की काय ? असे त्यांना सतत वाटत होते. कारण नरसू शाळेत असताना त्याची अभ्यासूवृत्ती त्यांना फार आवडायची. त्याचे ज्ञान हे चौकस होते.म्हणून त्यांना नृसिंह हा आपली ' जान ' आहे असे वाटायचे. परंतु ब-याच वर्षांने त्यांची नृसिंहशी भेट होते, तेव्हा त्या त्याला म्हणतात " नृसिंह भगवान जोशी ? अरे कुठल्या गुहेत दडून बसला होतास इतकी वर्ष ? बापरे ! मला वाटलं, आयुष्यातली ही इच्छा अतृप्त राहूनच मरुन जाणार आपण ! "[१९]

अशा प्रकारे त्यांच्या मनाची तळमळ लेखकाने कादंबरीतून मांडली आहे. नोकरीतून सेवानिवृत्त होऊन त्या मुलाकडे अमेरिकेला जाऊन राहतात. तेथे सर्व प्रकारचे सुख असतानादेखील त्यांना आपल्या मातृभूमीची प्रचंड ओढ असते. कारण त्यांना नातीपेक्षा इथली मातीच प्रिय वाटते. म्हणून त्या तिथलं एश्वर्य सोडून भारतात परत येतात. आपल्या आयुष्यातले शेवटचे श्वास हे मायदेशातच थांबवावेत. आपला देह हा याच धरणीवर पडावा. या इच्छेने त्या भारतात परत येतात. यातून लेखक देशाविषयीचे प्रेम व्यक्त करतात. पाश्चात्त्य राष्ट्रात कितीही भौतिक सुख असले तरी, इथले आत्मिक सुख तिकडे लाभणार नाही. याचे स्पष्टीकरण देतात.

इंग्रजीतून ' एम.ए.' झाल्यावर त्यांची ' आय.ए.एस. ' ला निवड होते. परंतु आईच्या विरोधामुळे त्यांना आय.ए.एस. बनता येत नाही. आणि त्यानंतर डॉ.आपटयांशी लग्न करून दिले जाते. आणि एका शाळेत शिक्षिका म्हणून त्यांना नोकरी करावी लागते. म्हणूनच त्या ' आय.ए.एस.' होण्याचे स्वप्न आपल्या विद्यार्थ्यांकडून पूर्ण करून घेण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात. ' नृसिंह ' कडे सतत याच दृष्टीने पाहतात. त्यासाठी नरसूचा पुढील शिक्षणाचा खर्च करण्यास देखील तयार असतात. परंतु त्याच्या मॅट्रिकनंतर त्यांची भेटच होत नाही.

वयाची पंच्याहत्तरी संपल्यानंतर त्यांना आरोग्याच्या अनेक समस्या उद्भवतात. तरी डॉक्टरांकडे जात नाहीत. कारण त्यांच्या मते " प्रत्येक उपभोगाचा अंत हा वेदनादायी असतो. हे तर अंतिम सत्य आहे. म्हणून तर साऱ्या संतांनी उपभोग निषिध्द मानून त्यांना त्यागायला सांगितलं

ना ? अशा तत्त्वज्ञानातून त्या समाधान व्यक्त करतात. यातून लेखकाने असे सूचित केले आहे की, केलेल्या कर्माचे फळे हे आपण भोगलेच पाहिजे. त्यापासून दूर पळता कामा नये. अशा विविध पैलूंच्या आपटेबाई या कादंबरीत लेखक चित्रित करतात. या व्यक्तिरेखेतून त्यांचा प्रेमळ स्वभाव, अभ्यासू वृत्ती, धार्मिक वृत्ती इत्यादी गुणांची सांगड घातली आहे. म्हणून आपटेबाई ही व्यक्तिरेखा कादंबरीत महत्त्वाची भूमिका बजावते असे म्हणता येईल. "

**' देहजावो अथवा जावो ' या कादंबरीतील गौण व्यक्तिरेखा:-**

**सुखदा :-**

प्रस्तुत कादंबरीतील नायक नृसिंह याची बायको ' सुखदा ' ही व्यक्तिरेखा लेखकाने गौण स्वरूपात मांडली आहे. अत्यंत सुंदर, गरीब कुटुंबातील ही व्यक्तिरेखा वाचकाचे लक्ष वेधून घेते. नारसूच्या व्यसनाधीनतेमुळे तिला घरातील जबाबदारी स्वीकारावी लागते. तिच्या माहेरी गरिबीची परीस्थिती असली तरी, तिचे लग्न नृसिंहासी लावून देताना ' टिळक मंदिरात ' लग्नाचं जंगी रिसेप्शन दिलं होत. विजय नगरापर्यंत लग्नाची वरात काढली होती. तीही गुजराथ्यामारवाडयांची असावी अशा थाटात, घोडयावरून. अशी लख्ख देखणी सुखदा वसईच्या गरीब शेतकऱ्याची पोर अंधेरीनगरीत येऊन पडली होती. अशा प्रकारे लेखकाने तिच्या सुंदरतेचे वर्णन केले आहे. आपल्या नशिबी मिळालेल्या नवऱ्याबरोबर ती संसार करीत होती.

परंतु इथली अनाठायी श्रीमंती आणि नरसूची व्यसनाधीनता पाहून ती मनातून अतिशय दु:खी झाली होती. तरी बरीच वर्षे ती मिटल्या तोंडी हे सगळं सहन करत होती. याला कंटाळून ती वटपौर्णिमेच्या निमित्ताने माहेरी जाते. ती परत येतच नाही. याच्या आधी नरसूचे व्यसन आणि चोरी करणे सुटावे म्हणून ती प्रयत्न करते. त्यामुळे ती कधी-कधी नवऱ्याचा सहवासही नाकारत होती. ती नवऱ्याला म्हणायची " तुमच्या घरात मी एवढे दिवस काढले आहेत. माहेरी आम्हीही दारीद्रय पाहिलं होतं. पण ते नाहीसं करण्यासाठी तुमच्या आईसारखा विपरीत मार्ग कुणी सुचवला नाही. आमच्याकडे कुणालाच कुणीही ! तुम्ही माईच्या शब्दाने चालणारे आहात हे मी पाहिले आहे. हे शेवटचं सांगते. दुसऱ्याच्या वेदना जशा कुणालाही घेता येत नाहीत, बदली करून येत नाहीत, तशी

पापंही नाही घेता येत, एकाची दुसऱ्याला. तुम्हालाच ती भोगावी लागतील. असल्या लक्ष्मीला ग
नसतो. तुम्ही अजूनही सुधारा ! "[२०]

अशा प्रेमळ शब्दाने ती नरसूला सुधारण्याचा प्रयत्न करत होती. या व्यसनाधीन परिस्थितीतून सुटका करण्यासाठी तिचा प्रयत्न असायचा. अशा प्रकारे लेखकाने प्रस्तु कादंबरीतून सुखदाची व्यक्तिरेखा साकारली आहे. सुखदाने या कादंबरीत आपले स्थान मजबू केले आहे.

**राघवची बायको** :-

नायकाचा सावत्रभाऊ राघवच्या बायकोची व्यक्तिरेखा लेखकाने या कादंबरीतून साकारली आहे. एका शाळेत शिक्षिका म्हणून ती काम करते. तिचा स्वभाव हा राघवच्या स्वभावापेक्षा कमी मवाळ आहे. राघव व त्याची बायको हे दोघेही माई आणि दादा राहात असलेल्या खोल्यां शेजारीच दोन खोल्या घेऊन राहतात. नरसूने मॅट्रिकनंतर शिकावे अशी तिची इच्छा असते. त्यासाठी ती कोणतीही मदत करण्यास तयार असते.

तिने विभक्त संसार थाटला असला तरी, सर्वांच्या सुखदुःखाविषयीची काळजी घेते. सासू-सासऱ्यांना वेळोवेळी मदत करते. नरसूच्या सर्व गरजा राघव आणि त्याची बायकोच पुरविते. याविषयी थोडीफार तिची नाराजी असली तरी, ती कर्तव्य म्हणून या सर्व लोकांकडे लक्ष देते. परंतु नरसूच्या व्यसनाचा अतिरेक होतो. व्यसनात आहे ते घर विकून टाकेल या भितीने ती नरसूला घराबाहेर काढतांना म्हणते - " इथं या खोल्यात आता तू राहायचं नाहीस. नाहीतर जागासु विकशील. ती सुकुमारसाठी ठेवलीय आम्ही ! इथून कायमचं निघून जायचं आता ! गुरख्या नाहीतर पोलिसांना बोलवायची वेळ तू न आणावीस ! घर तुझ्या नावांवर केलेल नाही दादांनी "[२१]

अशा शब्दांत नरसूला ती रागावते. स्पष्टपणे आपले मत ती व्यक्त करीत राहते. कारण तिचा याच्यामागे चांगला उद्देश असतो. पैशाची हाव तिला कधीच नसते. त्यामुळे म्हाताऱ्या सासू सासऱ्यांची काळजी घेते. त्यांना वेळोवळी पैशाची मदत करते व त्यांच्या संसाराला हातभा

लावते. दादाचं बेडेकर शॉपमधले काम सुटते व माईला म्हातारी झाल्याने डबा करणे शक्य नसते. तेव्हां ती त्यांना वेळोवेळी मदत करते.

लेखकाने राघवची बायकोही व्यवहारी व प्रेमळ अशा दोन्ही स्वरूपात दाखविली आहे. तिला आपल्या कर्तव्याची पूर्णपणे कल्पना असल्याचे या ठिकाणी दाखविले आहे. दोन्ही नवरा-बायको नोकरी करत असल्याने आर्थिक स्थैर्य होते. पण घरात मूल नव्हते. तिला वांझपणा स्वीकारावा लागला होता. त्यामुळे तिच्या चेहऱ्यावर सदैव अतृप्ती व औदासीन्य असायचे. हे दुःख ती पचविण्याचा प्रयत्न करते. अशा विविध वैशिष्टयांनी युक्त ही व्यक्तिरेखा या कादंबरीत लेखकाने साकारली आहे.

**तुरुंगातील विलक्षण तरूणाची आई - सावित्री निनावे** :-

तुरुंगातील तरूणाची आई ' सावित्री निनावे ' ही व्यक्तिरेखा अतिशय थोडया घटनांतून चित्रित झालेली आहे. तरी तिच्यातील वैशिष्टयामुळे विचार करावा लागतो. एका अनाथाश्रमात वाढलेली, नाव नसलेली अशी स्त्री ! तिथल्याच कुणी भल्या माणसाने तिला ' निनावे ' हे आडनाव दिलं आणि ' सावित्री ' हे नाव देऊन जणू त्या माणसाने तिला भविष्यच प्रदान केले आहे असे लेखक लिहितात.

तिचा स्वभाव आपल्या नव-याची सतीसावित्री होऊन राहायचं असाच होता. कारण आपल्यासारख्या अनाथ मुलीशी कुण्या वकिलाने लग्न करावे हेच तिच्यासाठी सद्भाग्य होते. म्हणून तिने आपल्या नव-याजवळ कधी ' हट्ट ' म्हणून केला नाही. ती आपल्या नव-याची तन-मन-धनाने सेवा करायची. त्याचा एकही शब्द वाया जाऊ देत नव्हती. त्यांची प्रत्येक अपेक्षा तिला समजत होती. यामध्ये ती पारंगत झाली होती. तरी नव-याच्या हुकमाला बळी पडावे लागते होते. त्यामुळे तिच्या चेह-यांवर नाराजी उमटत असायची. तिच्या मते, " ... त्यांची मर्जी ... आयुष्यभर अशी मर्जी राखण्यासाठी म्हणूनच तर ' तहहयात उपकृत ' भावना जिच्या मानत तेवत राहील अशी बायको ' इम्पोर्टेड फ्रॉम अनाथ आश्रम ' अशी बायको त्यांनी आयुष्यात खरेदी केली होती. "[२२]

म्हणजेच या तरुणाची आई तनाने सुखी असली तरी, मनाने मात्र दु:खी असायची. ती एका पुरुषाला बळी पडली होती. केवळ त्या पुरुषाचे आपल्यावर उपकार आहेत, म्हणून ती बिनबोभाटपणे हे दु:ख सहन करत होती. आपल्या मुलाने वडिलांचाच व्यवसाय करावा म्हणून ती आग्रह धरते. त्यासाठी तिला खूप प्रयत्न करावे लागतात. पण मुलगा ऐकण्याच्या मनस्थितीत नसतो. तेव्हा ती दोन-तीन दिवस अन्नत्याग करते आणि आपल्या मुलास या व्यवसायात पडण्यास भाग पाडते. म्हणजेच ती कुटुंबासाठी सर्वस्व आर्पण करते. ती आपल्या नव-याचे उपकार कधीच विसरत नाही. अशा प्रकारे लेखकाने या कादंबरीतून ही व्यक्तिरेखा साकारली आहे.

**नायकाचे वडील - दादा** :-

नायकाचे वडील ' दादा ' ही व्यक्तिरेखा सबंध कादंबरीतून अत्यंत कमी ठिकाणी चित्रित झाली आहे. ते विजयनगरातल्या दोन खोल्यामध्ये राहतात. आणि ' बेडेकर शॉप ' मध्ये कामाला जातात. हे काम त्यांना कायम स्वरुपात मिळल्याने तिथल्या मालकाडून विश्वास संपादन केला होता. दादांची आर्थिक परिस्थिती गरिबीची होती. त्यामुळे घर चालविण्यासाठी त्यांना माईच्या हातभाराची आवश्यकता वाटत होती. ते मुलांच्या गरजा पूर्ण करू शकत नव्हते. कारण नरसूने एकदा घरात सहलीला जाण्याच्या कारणावरुन पैशांचा हट्ट धरला होता. म्हणून दादा त्याच्यावर संतापले होते.

नरसूच्या व्यसनाला कंटाळून सुखदा माहेरी निघून जाते. तेव्हा दादा एकटेच घरात बसलेले असताना नरसूला पाहून म्हणतात, " अरे कायमची गेली, नशीब समज, त्यांनी आपल्या पापाचा पाढा वाचला नाही. निमूटपणे गेली दोघं जण !आणि ओक्याबोक्सी रडू लागले होते. "[२३]

अशा चित्रणातून लेखकाने दादांची व्यक्तिरेखा साकारली आहे. त्यात दादांच्या आयुष्यभरातील चढ - उतार लेखकाने दिले आहेत. देवाने दोन मुले दिलीत. त्यातला पहिला मुलगा व्यवस्थित असला, तरी दुस-याचे आयुष्य मात्र बरबाद झाले. या गोष्टीचे दादांना दु:ख वाटत असते.

**अश्विनशेट** :-

' अश्विनशेट मांजेकर सराफ ' ही व्यक्तिरेखा वाचकांचे लक्ष वेधून घेते. पाल्यांत अश्विनशेटचा सराफी व्यवसाय आहे. नायकाच्या कुटुंबाचे ते गेली अनेक वर्ष सराफी आहेत. स्वभावाने चांगले असल्याने नरसूने घर सोडल्यापासून अश्विनशेटच्या दुकानाच्या पायऱ्यांवरच आसरा शोधला आहे. कधी त्याला त्यांनी तिथून जा म्हणून सांगितले नाही. उलट नरसूला टायफॉईड होतो तेव्हा अश्विनशेट वैतागून चिंतन मारवाडयाकडे रिक्षा भाडं आणि वरती थोडेफार पैसे देऊन नरसूला ' कपूर ' हॉस्पिटलला भरती करण्यास पाठवितात.

दारूच्या नशेसाठी अंगठी विकेल म्हणून राघवची बायको त्याच्या बोटातून बिनभोबाटपणे काढून घेते. मात्र एके दिवशी भर दुपारी शटर ओढून दुकान बंद करतांना अश्विनशेट एक चांदीची अंगठी नरसूच्या हातावर ठेवून आश्चर्यचकित करतात.

अश्विनशेटचे आणि नरसूच्या घरातील कुटुंबियांचे संबंध पिढयांपिढयांचे असल्याने त्यांना नरसूच्या घरातील सर्व सुखदुःखाच्या गोष्टी माहीत होत असत. त्या नरसूपर्यंत पोहचविण्याचे काम अश्विनशेट करत होते. त्यामुळे ते वेळप्रसंगी त्याला अपमानित ही करीत होते. ते म्हणायचे - " आमच्या पाय-यांवर जर तुझं लाश पडलं तर पोलिसांचा आम्हाला त्रास होईल. तो तू होऊन जाऊ दे पण तू एकदाचा तरी खपून जा." अशा शब्दात ते नरसूला बोलत असायचे. अशाप्रकारची व्यक्तिरेखा निर्माण करून लेखकाने या कादंबरीच्या आशयात संपन्नता आणली आहे.

**चिंतन चहावाला** :-

चिंतनचा समोसा, भजी, वडापाव आणि चहा इत्यादी वस्तू तयार करण्यासाठी स्वतःचा एक गाडा आहे. तो दररोज आपल्या मुलाला घेऊन बाजारात गाडा लावतो. त्याची घाणा काढायची वेळ झाल्यावर जुन्या घाण्यातले समोसे कुण्या भिकाऱ्याला अथवा नरसूला दयायची सवय आहे. अथवा सरळ कचराकुंडीत टाकून दयायचा. बिनकामाच्या चौकशा करण्याचा त्याचा स्वभाव आहे. स्वतःच्या व्यवसायापेक्षा नरसूच्या अवस्थेकडे त्याचे अधिक लक्ष असते. नरसूबद्दल बिनकामाच्या चौकशा करतो. ते नरसूला अजिबात आवडत नाही.

प्लॅस्टिकच्या पिशवीत शिळा भात आणि भजी घेऊन तो नरसूला देतो. तो भात खाल्ल्याने नरसूच्या तोंडभर मुंग्या पसरतात. म्हणजे चिंतनची वृत्तीदेखील चांगली नसते. मात्र त्यांचे हावभाव खूप मोठे दान केल्यासारखे असतात. भात दिल्यावर आपल्या मुलाला म्हणतो, " तेरा हात चलता नही स्साले ! तो भी तेरा एक काम मैंने कम कर दिया. सुबेका चावल और भजीयॉ पडा हुआ था ढेर सारा वो मैं बेवडेके गलेमे बांधके आया ! तेरा काम बचाऊंगा तो भी तू सुधरेगा नही क्या ?"[२४]

लेखकाने या कादंबरीत चिंतनच्या व्यक्तिरेखातून एका बेरकी स्वभावाच्या व्यक्तीचे चित्रण केले आहे. त्यामुळे चिंतन हा कादंबरीतून सगळयांच्या लक्षात राहतो.

**बच्चूभाय** :-

अनेक गौण व्यक्तिरेखांपैकीच ' बच्चूभाय ' ही देखील एक व्यक्तिरेखा आहे. ' स्टेशनरीचा व्यवसाय आणि जनरल स्टोअर्स ' चालविणारा बच्चूभाय हे व्यक्तित्व अत्यंत आळशी स्वभावाचे लेखकाने चित्रित केले आहे. कारण तो काऊंन्टरवर नेहमी जांभया देत असलेला नरसूला दिसतो. नरसूला विविध प्रकारची कामं सांगण्याची त्याची सवय असते. तो ज्यावेळी चहा पित असे तेव्हा नरसूची नजर त्याच्या चहाच्या कपावर अशाळभूतपूणे खिळून राही. तेव्हा बच्चूभाय नरसूला म्हणायचे, " नरशा, तू पण चाय ले टपरीवर जाऊन ! हॅू पैसा आपीस !"

अशा प्रकारे नरसूला वेळोवेळी खाण्या - पिण्याचे पदार्थ देऊन खूश करीत असतं. नरसूने आयुष्यात सुख मिळविले नाही. कामधंदाही केला नाही. मात्र त्याचा मुलगा मात्र नोकरी करतो व त्याचे लग्नही ठरते. म्हणून बच्चूभायला अश्विनशेट म्हणतात की, " नरसूचा लेक बुध्दिमान आहे. तर बच्चूभाय आश्विनशेटला म्हणतात की, असणारच ! नरशाचा मुलगा ना तो? तो बुध्दिमान असणारच ना ! नरशाची बुध्दी दारू पिण्यात कामाला आली. लेकाची घरसंसार, नोकरी उदयोग करण्यामंदी कामाला येणार एटलाच फरक "[२५]

असा तिरस्कारयुक्त बच्चूभाय नरसूची चेष्टा करतो. या व्यक्तिरेखेचा देखील कांदबरीच्या दृष्टीने अभ्यास करणे आवश्यक ठरते. म्हणून ' बच्चूभाय ' चा विचार आपण या ठिकाणी केला.

**सोमा** :-

गुन्हेगारी जगताचे चित्रण लेखकाने या कादंबरीतून केले आहे. या जगतातील अनेक व्यक्तिरेखांपैकी ' सोमा ' ही महत्त्वाची व्यक्तिरेखा आहे. ठळक ठिकाणी सोमाचे चित्रण आलेले असले, तरी ते प्रभावी आहे. सोमा हा नरसूचा मित्र आहे. नरसूच्या बेडेकर शॉपमधील चोरीत महत्त्वाचा भागीदार म्हणून सोमाकडे पाहिले जाते. छोटया - मोठया गुन्हयातून तो आपले आयुष्य जगत असतो. त्यामुळे पोलिसांच्या तावडीत अनेक वेळा सापडतो. त्यामुळे त्याला दंडयाचा मारही खावा लागतो. नरसूची बेघर अवस्था बघून त्याला म्हणतो, " नर्शा तुज्या तकदीराचं आठवून लय मजा वाटली, म्हंतांना हसू आलं "[२६]

म्हणजेच स्वतःच्या भविष्याची काळजी नसलेला सोमा नरसूचे आयुष्य बघून चिंतीत होतो. यामुळे वाचकाला सोमाच्या वक्तव्याचे आश्चर्य वाटते. बाटलीत बुडालेल्या नशिबाची काळजी घेणारा सोमा या ठिकाणी चित्रित झालेला आहे.

एका बिल्डरच्या कामावर ' वॉचमन ' म्हणून असताना तेथील भंगार, लोखंडी वस्तू, लूज सिमेंट इत्यादी वस्तू विकून पैसे मिळवायचाआणि आपले व्यसन भागवायचा. म्हणून तिथून त्याला हाकलून दिले जाते. मात्र त्याचे गुन्हे करणे थांबत नाही तर उलट तो संभाजीनगरात एका तळघरात सुरु झालेल्या जाली नोटांच्या छापखान्यातून काही नोटा ' पन्नास टक्के ' नफ्याच्या कबुलीवर बाजारात चालवितो आणि मौज मजा करतो. अशा विविध गुन्हयातून सोमाची व्यक्तिरेखा लेखक या ठिकाणी साकारताना दिसतात.

**फरेराबाई** :-

फरेराबाई ही देखील गुन्हेगारी क्षेत्रातील व्यक्तिरेखा आहे. तिचा लग्नानंतर सासर आणि माहेर अशा दोन्हीकडून आसरा तुटल्याने ती मुंबईत दारुचा गुत्ता चालवून आयुष्य जगते. आपल्या मुलीला या धंदयापासून लांब ठेवून तिला खूप शिक्षण देते. पुढे आलेल्या दातांनी फरेराबाईचं हसणं आणि न हसणं कोणालाच कळत नव्हतं. तिचे इतर दातांबरोबरच दोन्ही कोपऱ्यातले दातही पुढे

यायचा प्रयत्न करत होते. ती शरीराने धष्टपुष्ट होती आणि स्वभवाने फटकळ आणि काहीशी प्रेमळ होती. अशा प्रकारचे व्यक्तिमत्त्व लेखकाने चित्रित केले आहे.

ती गिऱ्हाईकांशी प्रेमाने वागत होती. परंतु वेळप्रसंगी ती गुत्त्यावरून हाकलूनही देत होती. या तिच्या गुत्त्यावर नरसू दररोज जात होता. तो आत्मकथा लिहितोय हे बघून ती त्याला म्हणायची, " भटा मृत्यूपत्र लिवतोयस काय पेपरावर ? माजी बाकी भी लिहून ठेव त्येच्यात ! नायतं तू मशील नि बाकी हयात राहील तश्शीच "[२७] अशा प्रकारे तिचे फटकळ बोलणे सर्व गिऱ्हाईकांना ऐकावे लागायचे.

तिच्या मुलीच्या लग्नात सर्व गिऱ्हाइकांना बोलविण्याची तिची इच्छा असते. परंतु मुलीच्या सासरकडच्या लोकांना यातले काहीच चालत नाही. म्हणून ती लग्न झाल्यावर सर्व गिऱ्हाइकांना मोफत दारू पाजते. मात्र तिची मुलगी शिकलेली असल्याने ती हा गुत्ता चालवायला आईला विरोध करते. हा धंदा सोडण्याचा आग्रह धरते. त्यावेळी फरेराबाई म्हणते की, " ...मटका, जुगार जगाला चालतो. चरस, गर्दचा व्यापार चालतो, थोडं पुढं होऊन हायवेकडे गेलं की गल्लीबोळात बाया उभ्या ऱ्हायलेल्य दिसतात धंदयाला, ते चालतं जगाला बायका नाचतात ते लेडीजबार चालतात. आणि आमचा गरिबांसाठीचा गुत्ता बंद पाडायचा ? का ? गरिबांना नशा करायचा हक्क नाई ? नशेसाठी त्यांनी कुठे जावं ? आणि आम्ही तरी काय खावं ?"[२८]

अशाप्रकारे तिचा या धंदयाबद्दल आग्रह असायचा. लेखकाने फरेराबाईची व्यक्तिरेखा फटकळ आणि प्रेमळ अशा स्वभावाची सांगड घालत**निर्माण**केली आहे.

**' देह जावो अथवा जावो 'या कादंबरीतील इतर व्यक्तिरेखा** :-

प्रस्तुत कादंबरीत अनेक व्यक्तिरेखा आलेल्या आहेत. त्यातही प्रमुख तर काही दुय्यम स्वरूपाच्या आहेत. त्यांचा आपण या ठिकाणी अभ्यास केला. या व्यक्तिरेखांशिवाय इतरही काही व्यक्तिरेखा या कादंबरीतून येतात. लेखकाने या व्यक्तिरेखा अत्यंत कमी विस्ताराने मांडलेल्या आहेत. त्यांचा ही अभ्यास या प्रकरणात करणे आवश्यक आहे. या इतर व्यक्तिरेखांमध्ये नरसूचा

मुलगा सुकुमार, गजरा विकणारी सरला, आपटेबाईचा मुलगा डॉ. अनिरुध्द, गुत्तावाल्या फरेराबाईची मुलगी, तुरुंगातील बलात्कारी अधम, तुरुंगातील विलक्षण तरुणाची बायको, तेथील अनेक पोलिस आणि आपटेबाईचा विदयार्थी असलेला डॉ.संगीत तुळपुळे इत्यादी अनेक व्यक्तिरेखा येतात.

सुकुमार हा वडिलांपासून दुरावलेला आहे. वडिलांच्या व्यसनामुळे त्याला त्यांचा तिरस्कार वाटतो. तर फरेराबाईच्या मुलीला आई दारूचा गुत्ता चालविते म्हणून तिरस्कार वाटतो. तसेच तुरुंगातील विलक्षण तरुणाची बायको ही पतीच्या इच्छेविरुध्द कधीही वागत नाही. पण तिची आवड ही जगावेगळी आहे. तिला लोक झोपल्यावर महानगरात फिरायला आणि बाहेर जेवायला आवडते. तसेच अत्यंत गरीब परिस्थितीत असून देखील आनंदात राहणारी सरला ही या कादंबरीतून येते.तिची नरसूबरोबर राहण्याची इच्छा असते. मात्र नरसूला तिचा तिरस्कार वाटतो. तर आपटेबाईचा मुलगा डॉ.अनिरुध्द हा अमेरिकेत सर्जन आहे. आधुनिक विचाराचा त्याच्यावर प्रभाव आहे. डॉ. संगीत तुळपुळे हा देखील एक नामवंत डॉक्टर आहे. तो आपटेबाईचा विदयार्थी असल्याने त्यांच्या तब्येतीची विशेष काळजी घेतो. लेखकाने या कादंबरीच्या कथानकातून एक पोलिस ठाणे साकारले आहे. त्यामुळे अनेक भ्रष्टाचारी व लाचखोर पोलिस कादंबरीतून येतात. तसेच एका बलात्कारी अधमाने सहा वर्षाच्या स्वतःच्या मुलीवर बलात्कार केला आहे. अशा वैशिष्टयपूर्ण व्यक्तिरेखा कादंबरीच्या कथानकात विशेष भर घालतात. त्यांच्या वेगवेगळया व्यक्तिमत्त्वामुळे त्या स्वतंत्रपणे वाचकांच्या लक्षात राहतात. या व्यक्तिरेखातून लेखकाने कादंबरीला विशिष्ट रूप देण्याचा प्रयत्न केला आहे.

**समारोप** :-

प्रस्तुत कादंबरीचा आपण व्यक्तिरेखांच्या दृष्टीने विचार केला. या कादंबरीतून अनेक व्यक्तिरेखा साकारल्या आहेत. त्यांच्या आधारे लेखकाने एक वास्तवपूर्ण कथानक साकारले आहे. या कथानकाला पुढे नेण्याचे काम या व्यक्तिरेखा करतात. आपण या व्यक्तिरेखांची मुख्य, दुय्यम आणि इतर अशा तीन टप्प्यात विभागणी केली.

प्रमुख व्यक्तिरेखांमध्ये कादंबरीचा नायक नृसिंह ( नरसू ) याचा विचार केला. त्यात त्याची व्यसनाधीनता, बुध्दिमता, कविमनाचा इत्यादी वैशिष्टये अभ्यासली. तर माईच्या स्वार्थी स्वभावाची, तिची वैशिष्टयांची दखल घेतली. त्याचबरोबर मुख्य व्यक्तिरेखांमध्ये राघव, विलक्षण तरुण, मटकाकिंग आणि आपटेबाई यांच्या विविध गुणांचा व व्यक्तिमत्त्वांचाही आपण विचार केला.

गौण व्यक्तिरेखांचा विचार करतांना आपण या ठिकाणी त्यांच्या स्वभावाचा, अर्थिक स्थितीचा व व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास केला. या व्यक्तिरेखांमध्ये नरसूची बायको सुखदा, राघवची बायको, विलक्षण तरुणाची आई सावित्री निनावे, अश्विनशेट, चिंतन चहावाला, बच्चूभाय, सोमा आणि फरेरराबाई इत्यादी व्यक्तिरेखा अभ्यासल्या. या सर्व व्यक्तिरेखा कादंबरीत विशेष भर घालतात. या व्यक्तिरेखांच्या अभ्यासाबरोबरच इतर ही काही व्यक्तिरेखांचा अभ्यासाच्या दृष्टीने विशेष उल्लेख या प्रकरणातून केला आहे. या सर्व व्यक्तिरेखांचा विचार करणे या प्रकरणाचे उद्दिष्ट असल्याने त्या दृष्टीने आपण विचार केला. आता पुढील प्रकरणात ' देह जावो अथवा जावो ' या कादंबरीचे वाङ्मयीन विशेष पाहू.

## संदर्भ ग्रंथ


| ग्रंथकार | | ग्रंथनाम |
|---|---|---|
| १. प्र.वा. बापट व ना. वा.गोडबोले | : | मराठी कादंबरी तंत्र आणि विकास, व्हिनस प्रकाशन, पुणे. तिसरी आवृत्ती, १९७३ पृष्ठ. १११.११२. |
| २. कुसुमावती देशपांडे | : | मराठी कादंबरी पहिले शतक, प्रका. मराठी साहित्य संघ, मुंबई आवृत्ती - दुसरी, १९७५, पान -१६ |
| ३. डॉ. बाबुराव उपाध्ये | : | अक्षर वैदर्भी - अंक -पाचवा, ऑगस्ट-२००७, अमरावती, पान-३ |
| ४. सुमेध वडावाला ( रिसबूड ) | : | ' देह जावो अथवा जावो ', प्रकाशन नवचैतन्य प्रकाशन मुंबई, आवृत्ती - प्रथम, पान -६३ |
| ५. तत्रैव | : | पान : ११०-१११ |
| ६. तत्रैव | : | पान - १२३ |
| ७. तत्रैव | : | पान - १७० |
| ८. तत्रैव | : | पान - १० |
| ९. तत्रैव | : | पान - १२ |
| १०. तत्रैव | : | पान - २७ |
| ११. तत्रैव | : | पान - ६३ |
| १२. तत्रैव | : | पान - १०९ |
| १३. तत्रैव | : | पान - ४६ |
| १४. तत्रैव | : | पान - ४९ |
| १५. तत्रैव | : | पान - ५० |
| १६. तत्रैव | : | पान - ८५ |
| १७. तत्रैव | : | पान - ९४ |

१८. तत्रैव : पान - ९७

१९. तत्रैव : पान - १६५

२०. तत्रैव : पान - १७७

२१. तत्रैव : पान - १२८

२२. तत्रैव : पान - ३३

२३. तत्रैव : पान - ११६

२४. तत्रैव : पान - १३२

२५. तत्रैव : पान - १८३

२६. तत्रैव : पान - १६३

२७. तत्रैव : पान - ५५

२८. तत्रैव : पान - २९